# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०१.२०२२**

**जिल्हा : सांगली**

| मागील आठवड्यातील हवामान (२२.०१.२०२२ ते २८.०१.२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२९.०१.२०२२ ते ०२.०२.२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | दिनांक | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | - | पाऊस (मिमी) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| ३५ | ३१ | २९ | २७ | २८ | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३१ | ३२ | ३३ | ३२ | ३१ |
| १६ | १८ | १६ | १४ | १४ | - | - | किमान तापमान (अं.से.) | २० | २१ | २१ | २० | १९ |
| ३ | ३ | ६ | ३ | ३ | - | - | ढग स्थिती (आकाश) | ० | ० | ० | १ | ० |
| ९० | ८७ | ६७ | ८५ | ९० | - | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६० | ५९ | ५३ | ५८ | ५१ |
| ३४ | ५३ | ५३ | ४८ | ४४ | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४६ | ४५ | ४३ | ४० | ४० |
| ०.० | १.९ | ०.० | ०.० | ०.० | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १३.० | १०.० | ६.० | ८.० | ७.० |
| ०.० | २५.० | ०.० | ०.० | ०.० | - | - | वाऱ्याची दिशा | पु. | पु.ई. | पु.ई. | ई. | पु.ई. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३१.० ते ३३.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान १९.० ते २१.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ५१ ते ६०% तर दुपारची सापेक्ष आद्रता ४० ते ४६% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०७ ते १३ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २ ते ८ फेब्रुवारी दरम्यान कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ शेतकरी बंधूनी कार्यक्षम जलसिंचन व्यवस्थापणासाठी पिकाच्या अवस्थेनुसार, जमिनीच्या प्रकाराप्रमाणे शेतामधील विविध पिकांच्या पाण्याची गरज व सिंचन संच चालू ठेवण्याचा कालावधी ई. महत्वपूर्ण माहिती आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " फुले इरिगेशन शेड्यूलर (PIS)" हे अॅप डाउनलोड करून वापरावे.<br>➢ फळबागेतील तापमान नियंत्रित राहण्यासाठी फळबागांना शक्यतो रात्रीच्या वेळी पाणी द्यावे.<br>➢ फळबागेतील तापमान नियंत्रित राहण्यासाठी फळबागांमध्ये आच्छादनाचा वापर करावा.<br>➢ रब्बी हंगामातील गहू व हरभरा या पिकांना त्यांच्या गरजेनुसार पाण्याची उपलब्धता करून द्यावी. |
| **संदेश** | | गहू पिक पेरणीस ७० दिवस झाले असल्यास पिकावर १९:१९:१९ या विद्राव्य खताची २०० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. |
| **रब्बी ज्वारी** | दाणे भरणे ते पक्वता | ➢ पक्व होत असलेल्या ज्वारी पिकाचे पक्षांपासून संरक्षण करावे.<br>➢ ज्वारीच्या दाण्याच्या टोकाजवळ काळा ठिपक्याचे लक्षणे दिसताच ज्वारीची काढणी करावी व ८ ते १० दिवस कणसे उन्हात वाळवावीत |
| **मका** | शाखीय वाढ | **अमेरिकन लष्करी आळीचे नियंत्रण :**<br>➢ रासायनिक नियंत्रण: १. आळीच्या वाढीच्या सुरवातीच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निंबोळी अर्क ५%यांची ५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा** २. थायमेथोक्झाम १२.६ %+ लॅम्डा सायहेलोथ्रीन ९.५ % झेड सी. या मिश्र किटकनाशकाची ०.५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा** ३. क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५ % एस.सी. या किटकनाशकाची ०.३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.<br>➢ कीटकनाशकाची फवारणी केल्यानंतर मका पिकाचा हिरवा चारा लगेच जनावरांना खायला देऊ नये किंवा असा चारा लगेचच सायलेज तयार करण्यासाठी वापरू नये. |
| **गहू** | फुलोरा | ➢ गहू पिक पेरणीस ७० दिवस झाले असल्यास पिकावर १९:१९:१९ या विद्राव्य खताची २०० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात या प्रमाणात मिसळून फवारणी करावी.<br>➢ गहू पेरणीस ८० ते ८५ दिवस झाले असल्यास दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना पिकास पाणी द्यावे.<br>➢ गहू पिकावरील मावा किडीच्या नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम २५ डब्लूजी ५० ग्रॅम प्रती हेक्टर ५०० लिटर पाण्यात |

# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐेएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | मिसळून फवारणी करावी. |
| **हरभरा** | फुलोरा ते घाटे भरणे | ➢ हरभऱ्यावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारावेत व हेक्टरी ५ या प्रमाणे कामगंध सापळे लावावेत.<br>➢ हरभऱ्यावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी हेलिओकिल ५०० मिली ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून प्रती हेक्टर फवारणी करावी. |
| **द्राक्ष** | मणी वाढीची | ➢ हवेमध्ये जास्त आद्रता असल्याने व किमान तापमानात घट झाल्याने भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी अमपेलोमायसेस क्विसक्वालीस @ ५ ग्रॅम प्रती लिटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी.<br>➢ बागेमध्ये तापमान नियंत्रित राहण्यासाठी द्राक्ष बागेस सायंकाळी पाणी द्यावे. |
| **ऊस** | आडसाली | ➢ जानेवारी महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ४.०७ मिमी प्रती दिवस एवढा असतो ऊस पिकास दररोज २.२४ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ३४ मिनिटे चालवावा. |
| | पूर्व हंगामी ऊस | ➢ **पूर्व हंगामी ऊस:** पूर्व हंगामी ऊस पिक लागवडीस ६ ते ८ आठवडे पूर्ण झाले असल्यास रासायनिक खतांची मात्रा नत्र १३६ किलो (युरिया २९५ किलो) प्रती हेक्टरी या प्रमाणात द्यावी.<br>➢ जानेवारी महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ४.०७ मिमी प्रती दिवस एवढा असतो त्यामुळे ऊस पिकास प्रती दिवस २.२४ लिटर एवढ्या पाण्याची गरज असते त्यामुळे ऊस पिकाची पाण्याची गरज पूर्ण होण्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ३४ मिनिटे चालू ठेवावा. |
| **आले** | पक्वता | ➢ बाजारातील मागणीप्रमाणे पक्व आल्याची काढणी करावी. काढणीनंतर आल्याचे कंद स्वच्छ धुवून मातीपासून वेगळे करावे आणि बाजारात पाठवावे. |
| **केळी** | फळ वाढीची | ➢ थंडीमुळे होणारी इजा होऊ नये म्हणून फळबागेस सायंकाळी पाणी द्यावे.<br>➢ केळीचे घड सच्छिद्र प्लास्टिक बॅगने झाकावेत. |
| **डाळिंब** | वाढीची | ➢ डाळिंब फळपिकावर मावा, फुलकिडे, पांढरी माशी व फळे पोखरणारी आळी यांचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी सायनट्रिनीलप्रोल १०.२६% ओ.डी. ७ ते ९ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **हळद** | पक्वता | ➢ हळद पिकाची काढणी जातीनुसार पिकाचा कालावधी पूर्ण झाल्यावर करावी. काढणीपुर्वी जमिनीच्या प्रतीनुसार १५ ते २० दिवस पाणी देणे बंद करावे. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ रात्री जनावरे गोठ्यात बांधावीत आणि त्यांना थंडीतून बचावासाठी कोरडी उबदार जागा उपलब्ध करून द्यावी<br>➢ थंडीचा सामना करण्यासाठी व जनावरांना निरोगी ठेवण्यासाठी आहारात पुरेसे प्रथिने आणि खनिजे द्या.<br>➢ हिवाळ्यात जनावरांच्या उर्जेची गरज भागविण्यासाठी नियमितपणे जनावरांना मिश्रणासह मीठ व गव्हाचे धान्य, गूळ इत्यादी 10% - 20% प्रमाणात प्रति दिवस द्यावे.<br>➢ रात्रीच्या वेळी जनावरे / बकरीना उघड्यावर ठेवू नका. |
| **कुक्कुटपालन** | वाढीची | ➢ थंडीपासून बचावासाठी कोंबड्यांच्या शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन वातावरण उबदार ठेवा. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. :२८.०१.२०२२

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐेएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**